स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या मानव्यविद्याशाखेअंतर्गत 'मराठी' विषयातील
पीएच्.डी. (विद्यावाचस्पती) पदवीसाठी सादर करावयाचा
संशोधनाचा प्राथमिक आराखडा

मराठी कादंबरीतील तरुणांच्या जीवनसंघर्षाचा चिकित्सक अभ्यास (विशेष संदर्भ :- बारोमास, काहिली, व्हायरस,रहबर, फेसाटी, टिश्यूपेपर, वॉन्टेड, वांझ, हेलपाटा, फिरकी)

संशोधक
श्री धनंजय उद्धवराव काळे
भ्रमणध्वनी क्र. 7875834434
ईमेल-dhanukale@gmail.com

मार्गदर्शक
प्रा.डॉ. हंसराज दत्तात्रय भोसले
मराठी विभाग, महाराष्ट्र महाविद्यालय, निलंगा, जि.लातूर.
भ्रमणध्वनी क्र.9970164491, 9421448107
ईमेल – hansb110378@gmail.com

संशोधन केंद्र
दयानंद कला महाविद्यालय, लातूर, जि.लातूर.

जानेवारी 2024

मराठी कादंबरीतील तरुणांच्या जीवनसंघर्षाचा चिकित्सक अभ्यास (विशेष संदर्भ :- बारोमास, काहिली, व्हायरस,रहबर, फेसाटी, टिश्यूपेपर, वॉन्टेड, वांझ, हेलपाटा, फिरकी)

१.१ प्रस्तावना :

कादंबरी वाङ्मय प्रकार हा जागतिक पातळीवर लोकप्रियता पावलेला वाङ् मय प्रकार आहे. तसे पाहता हा वाङ्मय प्रकार आधुनिक काळात उदयाला आलेला वाङ्मय प्रकार आहे. कथा सांगणे किंवा ऐकणे ही मानवाची प्राचीन प्रवृत्ती आहे. कथेचे लघुरूप म्हणजे कथा वाङ्मय आणि कथेचे दीर्घ रूप म्हणजे कादंबरी असेही म्हणता येईल. खऱ्या अर्थाने कादंबरीचे रूप १८ व्या शतकात उदयाला आले आणि एकोणिसाव्या शतकात एक प्रधान वाङ्मय प्रकार म्हणून मान्यता मिळाली. तसे पाहता मराठी कादंबरी वाङ्मयाचा उदय उशिराने झाला.

इंग्रजी नॉव्हेल या संज्ञेवरून मराठीत कादंबरीची संज्ञा रूढ झाली. पुढे पुढे काळानुरूप तिच्या रूपातही बदल होत गेले. कादंबरी या वाङ्मय प्रकाराच्या संकल्पनेच्या अनुषंगाने फार मोजक्याच समीक्षकांनी विचार केलेला दिसून येतो. त्यात हरिभाऊ आपटे, वि.का. राजवाडे व श्रीधर व्यंकटेश केतकर अशा काही मोजक्याच अभ्यासकांची नावे घेता येतील. त्यानंतर दुर्गा भागवत, कुसुमावती देशपांडे, नरहर कुरुंदकर यांनी कादंबरी वाङ्मयाचा सखोल अभ्यास केलेला आहे. अलीकडच्या काळात मराठी साहित्याचे अभ्यासक वा.ल. कुलकर्णी, भालचंद्र नेमाडे, विजया राजाध्यक्ष, उषा हस्तक अशा काही मोजक्याच समीक्षकांनी मराठी कादंबरी वाङ्मयाचा विस्तृत अभ्यास केलेला आहे. कुसुमावती देशपांडे यांची कादंबरी वाङ् मयाच्या अनुषंगाने केलेली विस्तृत आणि समर्पक मांडणी महत्वपूर्ण आहे त्या म्हणतात. ‘राजकीय घडामोडीमुळे सामाजिक जीवनाची घडी इतकी विस्कटली नसती.व त्यांच्या अवशेषांची जास्त जपणूक झाली असती तर या फारशी किंवा इंग्रजी साहित्याशिवाय मराठी कादंबरीची उत्क्रांती झाल्याशिवाय राहिली

नसती'(१)हे वरील विवेचन कादंबरी वाङ्मयाच्या अनुषंगाने व्यक्त झालेले आहे ते समर्पक वाटते.

मराठी कादंबरी ही खऱ्या अर्थाने पेशवाईच्या अस्तानांतर अनुवादाच्या रूपाने मराठी कादंबरीचा उदय झाला. पुढे ती विविध टप्प्यातून प्रवास करत विकसित झाली. त्यानंतर १८०० ते १८७४ हा या कादंबरीचा प्रारंभिक कालखंड असून हरी केशवजी पाठारे यांच्या 'यांत्रिकक्रमन' या कादंबरीने मराठी कादंबरीचा पाया रचला. पण मराठीतील स्वतंत्र कादंबरी म्हणून बाबा पद्मनजी यांच्या 'यमुनापर्यटन' या कादंबरीलाच मान जातो. याच कालखंडात ऐतिहासिक कादंबऱ्याचे पर्व निर्माण झाले. तो मान रा.भि. गुंजीकर यांच्या 'मोचनगड' या कादंबरीला जातो. तसेच पौराणिक कादंबरी व बखरी याच कालखंडात निर्माण झाल्या. त्यानंतर काही अद्भुतरम्य कादंबऱ्या निर्माण झाल्या. त्यात लक्ष्मणशास्त्री हळबे यांच्या 'मुक्तामाला' या कादंबरीचा उल्लेख करता येईल.

या कालखंडानंतर १८७४ ते १९२० हा कालखंडही उल्लेखनीय आहे. या कालखंडात नवविचाराचे अनेक कादंबरीकार उदयाला आले. या कादंबरीने साहित्यविश्वात स्वतःचे अस्तित्व निर्माण केले. या कालखंडात ह.ना. आपटे ते ना.ह. आपटे अशा अनेक कादंबरीकारांनी या कालखंडाची धुरा सांभाळली. यानंतर ह. ना.आपटे आणि पु. य. जोशी नंतर गडकरी बाळकृष्ण यांनी कादंबरीला नवी उभारी देण्याचे काम केले. हरिभाऊ आपटे यांच्या सामाजिक कादंबरीनंतर ऐतिहासिक कादंबरी समृद्ध करणारे कादंबरीकार म्हणून नाथमाधव यांचे योगदान महत्त्वाचे ठरले. हा कालखंड विशेषता नवनिर्मित विचाराचा कालखंड म्हणून ओळखला जातो.

इ .सन १९२० ते १९४५ या कालखंडात परिवर्तनवादी विचाराची कादंबरी जन्माला आली. याच कालखंडात टिळक युगाचा अस्त होऊन गांधीयुगाचा प्रारंभ झाला. या कालखंडात अनेक कादंबरीकारांनी कादंबरी वाङ्मयात मोलाचे योगदान दिले. त्यात श्रीधर व्यंकटेश केतकर, ना.शि. फडके, वि. स. खांडेकर, पु. य. देशपांडे,

ग. त्र्यं. माडखोलकर, मामा वरेरकर, मो.ग.रांगणेकर, बाळकृष्ण कवठेकर, रघुवीर सामंत अशा अनेक कादंबरीकारांचे योगदान या कालखंडात राहिलेले आहे. या कालखंडात विपुल कादंबऱ्या निर्माण झाल्या. यानंतरचा कालखंड म्हणजे इ. सन १९४५ ते १९६० चा या कालखंडातील कादंबरीवर महायुद्धाचा व मार्क्सवादी विचाराचा प्रभाव दिसून येतो. याच कालखंडात नवनवे प्रवाह जन्माला येऊ लागले. या कालखंडातील कादंबरीसुद्धा फडके- खांडेकर यांच्यापासून दूर जाऊ शकली नाही. याच कालखंडात अनेक वाङ्मयीन वाद निर्माण झाले. तसेच याच कालखंडात गुलामगिरीचे जोखड फेकून कादंबरी लेखनाला प्रारंभ केला. त्यात विभावरी शिरूरकर यांचे नाव प्रामुख्याने घेता येईल.

या कालखंडात एकीकडे स्वातंत्र्यप्राप्तीची अस्मिता जागृत झाली. औद्योगिक कारणाने बकाल जीवनाचे वास्तव नजरेस आले. मनोविश्लेषण व मार्क्सवादाच्या प्रभावाने कादंबरीवर परिणाम झाला तर दुसरीकडे ग्रामीण ,आदिवासी, दलित, स्त्रीवादी, मुस्लिम, जनवादी साहित्य प्रवाहांचे साहित्यही निर्माण होण्यास प्रारंभ झाला. म्हणून १९६० नंतरचा कालखंड अत्यंत महत्त्वाचा ठरला. या कालखंडात महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाली आणि सामाजिक चळवळींना उधाण आले. म्हणून या कालखंडात प्रवाहांच्या सोबतच ऐतिहासिक, पौराणिक, चरित्रात्मक असे ठळक प्रवाहही उदयाला आले. त्यामुळे मराठी कादंबरीचे स्वरूप विस्तारत गेले.

याच पार्श्वभूमीवर मराठी कादंबरी वाङ्मयात अमुलाग्र बदल होऊन मराठी ग्रामीण, आदिवासी, दलित, स्त्रीवादी, मुस्लिम, जनवादी प्रवाहाने साहित्यात क्रांतीच घडवून आणली म्हटले तरी वावगे ठरणार नाही. इ .सन १९६० नंतर एकूणच प्रवाहातील साहित्याला नवी उभारी मिळाली. याच कालखंडात 'खाऊजा' धोरणाचा प्रचंड प्रभाव मराठी साहित्यावर निर्माण झालेला दिसून येतो. यातून शिक्षणासारखे महत्त्वाचे क्षेत्र राजकारणाने प्रभावित झाले. त्यामुळे प्रचंड बेरोजगारी निर्माण होऊ लागली. त्यामुळे ग्रामीण,आदिवासी, दलित, स्त्रीवादी, मुस्लिम, जनवादी आदि प्रवाहाच्या साहित्यावर तद्वतच समाजजीवनावर झालेल्या प्रभावाची

नोंद कादंबरीने घेतली. दारिद्र्य, अज्ञान, अन्याय-अत्याचार, अंधश्रद्धा, बेरोजगारी, जातीयता अशा एकूणच जीवनाचे दाहक वास्तव प्रस्तुत कालखंडातील कादंबरीने अधोरेखित केले. म्हणून एकविसाव्या शतकातील निवडक कादंबरीतून आलेले बेरोजगार तरुणांच्या जीवन संघर्षाचे चित्रण मोठ्या प्रमाणात कादंबरीतून प्रकट झाले. त्या जीवनातील जीवनसंघर्षाचा अभ्यास करण्याच्या हेतूने सदरील विषयाची निवड मला महत्त्वाची वाटली .

मराठी कादंबरीतील तरुणांच्या जीवनसंघर्षाचा चिकित्सक अभ्यास (विशेष संदर्भ :- बारोमास, काहिली, व्हायरस,रहबर, फेसाटी, टिश्यूपेपर, वॉन्टेड, वांझ, हेलपाटा, फिरकी) या विषयानुषंगाने खालील कादंबरीकार आणि त्यांच्या कादंबऱ्या यांचा परिचय थोडक्यात देण्याचा प्रयत्न केलेला आहे. तो असा सदानंद देशमुख यांच्या ‘बारोमास’ या कादंबरीतून ग्रामीण जीवनातील वास्तव चित्रित झालेले आहे .सदरील कादंबरीत कृषी व्यवस्थेतील बदलामुळे पारंपरिक-आधुनिक अशा पेचप्रसंगात अडकलेल्या शेतकरी कुटुंबातील सुशिक्षित संवेदनशील तरुणांच्या वाट्याला आलेल्या भोगाचे यथार्थ वास्तव बारोमासमधून आलेले आहे, तर अनंत राऊत यांच्या ‘काहीली’मधून शिक्षणक्षेत्रातील बाजारीकरणाची काळी बाजू उलगडून सांगणारी कादंबरी म्हणून तिचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. प्राध्यापक भरती प्रक्रिया आणि मुलाखती कशा फार्स झालेल्या आहेत. गुणवत्ता डावलून कशी पायदळी तुडवली जाते. अशा अनेक घटना प्रसंगाच्या अनुभवातून शिक्षण आणि अन्य क्षेत्रातील विदारक वास्तव लेखकाने व्यक्त केलेले आहे . तसेच रवींद्र ठाकूर यांच्या ‘व्हायरस’मधून विद्यापीठीय राजकारण आणि शिक्षणक्षेत्राची झालेली पडझड याचा व्यामिश्र बंध उलगडणारी कादंबरी म्हणून महत्त्वपूर्ण आहे. शिक्षण व्यवस्थेत शिरलेल्या प्रदूषणाचे व राजकारणाचे वास्तव लेखकाने कादंबरीत साकारलेले आहे. तर रफिक सुरज यांची ‘रहबर’ ही कादंबरी सलीम मुजावर या नायकाच्या रूपाने मानवता हा धर्म मुसलमानांना का नाही? हा प्रश्न उभा केला आहे. प्रस्तुत कादंबरीतील नायकाचे कुटुंब व त्यांचे अनेकविध पातळीवरील जीवनविश्व. तसेच सुशिक्षित मुस्लीम तरुणांच्या अस्वस्थतेची व असुरक्षिततेची वेदनामय कहाणी म्हणजे ‘रहबर’ ही कादंबरी होय.

नवनाथ गोरे यांच्या 'फेसाटी' मधला नायक बेरोजगारी विरुद्ध संघर्ष करणार आहे. सदरील कादंबरीत भूक, दारिद्र्य, दुष्काळ, अन्याय-अत्याचार व अंधश्रद्धा तसेच भ्रष्टशासन व्यवस्था, अवैध सावकारी, बेरोजगारी यातून होत असलेली होरपळ आणि त्याविरुद्ध पेटून उठणारा अल्पभूधारक बेरोजगार नायक आणि त्याच्या कुटुंबाचा जीवनसंघर्ष म्हणजे 'फेसाटी' ही कादंबरी होय. तसेच रमेश रावळकर यांच्या 'टिशूपेपर' या कादंबरीत दोन वर्गाचे विदारक वास्तव आलेले आहे. एक वर्ग म्हणजे परमिट रूम, बार, हॉटेल तर दुसऱ्या बाजूला रोजीरोटीला महाग झालेले गोरगरीब, शोषित व पीडित लोक आशा परमिट रूममध्ये काम करणाऱ्या कामगारांच्या आयुष्याचा पट म्हणजे 'टिशूपेपर' ही कादंबरी होय. तर वामन जाधव यांच्या 'वॉँटेड' मधून सुशिक्षित बेरोजगारांच्या हातबलतेचा शिक्षण सम्राट कसा फायदा घेऊन त्यांचे शोषण करतात. याचे वास्तव लेखकाने चित्रित केलेले आहे. या कादंबरीचा नायक हा शिवाजी भोसले सुशिक्षित बेरोजगार तरुण आहे. ज्ञानदानाच्या क्षेत्रात अध्यापनापेक्षा इतर गोष्टीतच गोवून त्यांची गळचेपी केली जाते. सीएचबीवर काम करणाऱ्या अध्यापकांची कशी ससेहोलपट केली जाते. याचे मार्मीक दर्शन लेखकाने घडविलेले आहे. तसेच मिलिंद कांबळे यांच्या 'वांझ'मधून उच्चशिक्षित बेरोजगार तरुणांची वेदना आणि त्यांचा जीवनसंघर्ष शब्दांकित झालेला आहे. येथील भ्रष्टशिक्षण व्यवस्थेला आणि शिक्षणसम्राट यांना दिलेली शिवी म्हणजे 'वांझ' होय. सदरील कादंबरीमध्ये उच्चशिक्षित सीएचबी प्राध्यापकांच्या आयुष्याची कशी राखरांगोळी झाली. याचे विदारक वास्तव लेखकाने अधोरेखित केलेले आहे. याबरोबरच बाळासाहेब भडकवाड यांच्या 'फिरकी' मध्ये ग्रामीण भागातील मांग/ मातंग जातीच्या सुशिक्षित तरुणांच्या जीवनातील जातीयता,गरिबी आणि दारिद्र्याचे वास्तव चित्रित झालेले आहे. मांग/ मातंग जातीत जन्माला आलेल्या नाम्या या प्रमुख व्यक्तिरेखेच्या माध्यमातून ग्रामीण जीवनातील जातीयता, दारिद्र्य, अज्ञान आणि अंधश्रद्धा याचे विदारक वास्तव लेखकाने प्रकट केलेले आहे . तसेच तानाजी बबन धरणे यांच्या 'हेलपाटा' मधून ग्रामीण भागातील सुशिक्षित बेरोजगार

तरुणांच्या वाट्याला आलेला जीवन संघर्ष तर येतोच; पण दारिद्र्य, उपासमार आणि त्यामुळे त्यांच्या जीवनाची झालेल्या हेळसांडीचे वास्तव मांडणारी कादंबरी आहे. अशा एकूण दहा निवडक कांदबऱ्यामधून बेरोजगार सुशिक्षित 'तरुणांच्या जीवनाचे झालेले चित्रण प्रस्तुत संशोधनात अभ्यासण्याचा प्रयत्न केला जाणार आहे .

१.२ संशोधन निवडीची भूमिका :

प्रस्तुत संशोधनासाठी निवडण्यात आलेल्या विषयाच्या अनुषंगाने अभ्यास करत असताना मराठी निवडक कादंबरीतून चित्रित झालेल्या तरुणांचे जीवनचित्रण हा विषय प्रस्तुत संशोधनासाठी निवडण्यात आलेला आहे. समकालीन काळामध्ये मराठी कादंबरीमधून शिक्षण व्यवस्था, जातीयता, धर्मांधता तसेच शिक्षण व्यवस्थेमध्ये शिक्षणमहर्षी जन्माला न येता शिक्षण सम्राटच अधिक जन्माला आले. त्यामुळे उच्चशिक्षण क्षेत्रातच नाही तर एकूणच शिक्षणक्षेत्रात बेरोजगार तरुणांच्या हाताला कामच उपलब्ध झालेले नाही. मग ते शिक्षणक्षेत्र असेल किंवा उद्योग असतील अशा विविध क्षेत्रांमध्ये बेरोजगारी प्रचंड वाढलेली आहे . आज तरुणांचे लोंढेच्या लोंढे महाविद्यालयांमधून बाहेर पडतात ; परंतु हे शिक्षण विद्यार्थ्यांच्या हाताला काम देण्यात यशस्वी झालेले नाही. म्हणून मराठीच नाही तर एकूणच भाषेतील साहित्यामध्ये या अनुषंगाचे वास्तव अधोरेखित झालेले आहे. या अधोरेखित वास्तवाचा संशोधनाच्या अनुषंगाने विचार व्हावा आणि सामान्य माणसापर्यंत या जीवनातील व्यथा-वेदना पोहोचाव्यात हाच उद्देश समोर ठेवून प्रस्तुत संशोधन विषयाची निवड करण्यात आलेली आहे.

१.३ संशोधनाची व्याप्ती व मर्यादा :

मराठी कादंबरीतील तरुणांच्या जीवनसंघर्षाचा चिकित्सक अभ्यास (विशेष संदर्भ :- बारोमास, काहिली, व्हायरस,रहबर, फेसाटी, टिश्यूपेपर, वॉन्टेड, वांझ, हेलपाटा, फिरकी) या प्रस्तुत विषयाच्या अनुषंगाने संशोधन करीत असताना संशोधनाला एक चौकट प्राप्त व्हावी. संशोधनाची एक दिशा निश्चित व्हावी. या

अनुषंगाने संशोधनाची व्याप्ती आणि मर्यादा ही निश्चित केलेली असते आणि म्हणून प्रस्तुत संशोधनासाठी एकविसाव्या शतकात निर्माण झालेल्या कादंबऱ्या तसे पाहता विपुल प्रमाणात आहेत; परंतु काही निवडक कादंबऱ्यांचा अभ्यास आणि त्यातून चित्रित झालेले बेरोजगार तरुणांच्या जीवनसंघर्षाचे वास्तव संशोधनाच्या अनुषंगाने मांडावे. हा प्रांजल हेतू ठेवून प्रस्तुत संशोधनाची एक चौकट निश्चित करण्यात आलेली आहे . त्यात निवडक दहा लेखकाच्या दहा कादंबऱ्यांचा अभ्यास प्रस्तुत संशोधनासाठी निश्चित करण्यात आलेला आहे. ही प्रस्तुत संशोधनाची मर्यादा आहे तर एकूणच मराठी कादंबरी वाङ्मय ही या प्रस्तुत संशोधनाची व्याप्ती आहे .

१.४ संशोधन पद्धती :

प्रस्तुत संशोधनाचा अभ्यास करत असताना संशोधन पद्धतीसुद्धा महत्त्वाची ठरते. प्रस्तुत संशोधनाच्या पद्धतीनेमध्ये संशोधनाच्या अनेक पद्धती अस्तित्वात आहेत. त्यापैकी प्रस्तुत संशोधनासाठी विश्लेषणात्मक व समीक्षात्मक संशोधन पद्धतीचा अवलंब करण्यात येणार आहे . संशोधनासाठी प्राथमिक आणि दुय्यम स्रोतांचा अवलंब करून संशोधनाला दिशा देण्याचा प्रयत्न असेल .

१.५ संशोधनाची उद्दिष्टे :

संशोधनाच्या अनुषंगाने केलेली उद्दिष्टांची मांडणी खालीलप्रमाणे.

१) निवडक कादंबरीच्या स्वरूपाचा शोध घेणे.

२) निवडक कादंबरीतून चित्रित झालेल्या तरुणांच्या जीवनसंघर्षाचा शोध घेणे.

३) निवडक कादंबरीतून चित्रित झालेल्या दारिद्र्याचा शोध घेणे.

४) निवडक कादंबरीतून चित्रित झालेल्या अन्याय- अत्याचारासह दुःखद वेदनेचा शोध घेणे.

५) निवडक कादंबरीतून अधोरेखित झालेल्या शिक्षण व्यवस्थेतील बाजारीकरणाच्या वास्तवाचा शोध घेणे.

६) निवडक कादंबरीतून आलेल्या जातीय समाज व्यवस्थेचा शोध घेणे.

७) निवडक कादंबरीतून चित्रित झालेल्या सामाजिक, धार्मिक, राजकीय व आर्थिक जीवनाचा शोध घेणे.

८) शिक्षणासारख्या पवित्र क्षेत्रात शिरकाव झालेल्या राजकारणाचा शोध घेणे.

१.६ संशोधनाची गृहितके:

१) निवडक कादंबरीत सामाजिक, धार्मिक,राजकीय व आर्थिक जीवनाचे वास्तव अधोरेखित झालेले आहे.

२) निवडक कादंबरीतून तरुणांच्या जीवन संघर्षाचे वास्तव चित्रित झालेले आहे.

३) निवडक कादंबरीत दारिद्र्याचे व अन्याय-अत्याचारासह दुःखद वेदनेचे वास्तव उजागर झालेले आहे.

४) निवडक कादंबरीतून जातीय धर्मांध प्रवृत्तीच्या जीवन वास्तवाचे चित्रण आलेले आहे.

५) निवडक कादंबरीतून समकालीन शिक्षणव्यवस्थेतील बाजारीकरणाचे वास्तव अधोरेखित झालेले आहे.

६) शिक्षणासारख्या पवित्र क्षेत्रातही राजकारणाचा शिरकाव झालेला आहे.

१.७ प्रकरण रचना:

प्रस्तुत संशोधन अभ्यासाच्या अनुषंगाने खालीलप्रमाणे प्रकरण निहाय मांडणी केलेली आहे .

प्रास्ताविक :

सदरील प्रास्ताविकात विषयाच्या अनुषंगाने मांडणी करून संशोधनपद्धती,संशोधनाची भूमिका, संशोधनाची उद्दिष्ट्ये,संशोधनाची गृहितके, संशोधनाची मर्यादा व व्याप्ती, संशोधनाचे महत्त्व या अनुषंगाची मांडणी केली जाईल.

प्रकरण पहिले :मराठी कादंबरी वाङ्मचा स्थूल आढावा :

सदरील प्रकरणात मराठी कादंबरी वाङ्मयाचा प्रारंभ आणि कादंबरी वाङ् मयात निर्माण झालेली स्थित्यंतरे याचा स्थुल आढावा घेतला जाईल .

प्रकरण दुसरे : निवडक कादंबरीचे स्वरूप:

सदरील प्रकरणात संशोधनाच्या अनुषंगाने निवडण्यात आलेल्या कादंबऱ्याच्या स्वरूपाचा अभ्यास अपेक्षित आहे. त्यात सदानंद देशमुख 'बारोमास',अनंत राऊत 'काहीली', रवींद्र ठाकूर 'व्हायरस', रफिक सुरज 'रहबर',नवनाथ गोरे 'फेसाटी',रमेश रावळकर 'टिश्युपेपर', वामन जाधव 'वाँटेड',मिलिंद कांबळे 'वांझ',तानाजी धरणे 'हेलपाटा',बाळासाहेब भडकवाड 'फिरकी' या एकूण दहा कादंबरीतून आलेल्या जीवनवास्तवाचे स्वरूपाचा अभ्यास करण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे.

प्रकरण तिसरे : निवडक कादंबरीतील तरुणांचा जीवनसंघर्ष :

सदरील प्रकरणात संशोधनाच्या अनुषंगाने निवडण्यात आलेल्या कादंबऱ्यातील तरुणांचा जीवनसंघर्ष कसा आला? हा अभ्यास अपेक्षित आहे. त्यात

सदानंद देशमुख ‘बारोमास’,अनंत राऊत ‘काहीली’, रवींद्र ठाकूर ‘व्हायरस’, रफिक सुरज ‘रहबर’,नवनाथ गोरे ‘फेसाटी’,रमेश रावळकर ‘टिश्युपेपर’, वामन जाधव ‘वाँटेड’,मिलिंद कांबळे ‘वांझ’,तानाजी धरणे ‘हेलपाटा’,बाळासाहेब भडकवाड ‘फिरकी’ या एकूण दहा कादंबर्‍यातून आलेल्या जीवनसंघर्षाचे वास्तव शोधण्याचा प्रयत्न केला जाईल.

प्रकरण चौथे: निवडक कादंबरीतील प्रमुख व्यक्तिरेखा :

सदरील प्रकरणात संशोधनाच्या अनुषंगाने निवडण्यात आलेल्या कादंबर्‍यामधील प्रमुख व्यक्तिरेखांचा अभ्यास अपेक्षित आहे. त्यात सदानंद देशमुख ‘बारोमास’,अनंत राऊत ‘काहीली’, रवींद्र ठाकूर ‘व्हायरस’, रफिक सुरज ‘रहबर’,नवनाथ गोरे ‘फेसाटी’,रमेश रावळकर ‘टिश्युपेपर’, वामन जाधव ‘वाँटेड’,मिलिंद कांबळे ‘वांझ’,तानाजी धरणे ‘हेलपाटा’,बाळासाहेब भडकवाड ‘फिरकी’ या एकूण दहा कादंबरीतून आलेल्या विविध स्वरूपाच्या व्यक्तिरेखांचा अभ्यास करण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे.

प्रकरण पाचवे: निवडक कादंबरीची भाषाशैली:

सदरील प्रकरणात संशोधनाच्या अनुषंगाने निवडण्यात आलेल्या कादंबरीच्या भाषाशैलीचा अभ्यास अपेक्षित आहे. त्यात सदानंद देशमुख ‘बारोमास’,अनंत राऊत ‘काहीली’, रवींद्र ठाकूर ‘व्हायरस’, रफिक सुरज ‘रहबर’,नवनाथ गोरे ‘फेसाटी’,रमेश रावळकर ‘टिश्युपेपर’, वामन जाधव ‘वाँटेड’,मिलिंद कांबळे ‘वांझ’,तानाजी धरणे ‘हेलपाटा’,बाळासाहेब भडकवाड ‘फिरकी’ या एकूण दहा कादंबरीतून आलेल्या भाषेच्या स्वरूपाचा अभ्यास करण्यात येणार आहे.

प्रकरण सहावे: निवडक कादंबरीचे वाङ्मयीन मूल्यमापन :

सदरील प्रकरणात संशोधनाच्या अनुषंगाने निवडण्यात आलेल्या कादंबऱ्याचे वाङ्मयीन मूल्यमापन करण्याचा प्रयत्न केला जाईल. त्यात सदानंद देशमुख 'बारोमास',अनंत राऊत 'काहीली', रवींद्र ठाकूर 'व्हायरस', रफिक सुरज 'रहबर',नवनाथ गोरे 'फेसाटी',रमेश रावळकर 'टिश्युपेपर', वामन जाधव 'वाँटेड',मिलिंद कांबळे 'वांझ',तानाजी धरणे 'हेलपाटा',बाळासाहेब भडकवाड 'फिरकी' या एकुण दहा कादंबरीतून आलेल्या वाङ्मयीन मूल्यांचा अभ्यास करण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे.

प्रकरण सातवे : उपसंहार व निष्कर्ष :

सदरील प्रकरणात एकूण शोधप्रबंधाचा उपसंहार प्रकरणनिहाय मांडून निष्कर्षाची नोंद करून शेवटी संदर्भ ग्रंथाची यादी जोडली जाईल .

संदर्भग्रंथ सूची :

१) सदानंद देशमुख, बारोमास, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे

२) अनंत राऊत, काहिली, स्वरूप प्रकाशन, पुणे

३) रवींद्र ठाकूर, व्हायरस, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे

४) रफिक सुरज, रहबर

५) नवनाथ गोरे, फेसाटी, अक्षर वाङ्मय प्रकाशन, पुणे

६) रमेश रावळकर, टिश्युपेपर, राजहंस प्रकाशन, पुणे

७) वामन जाधव, वाँटेड

८) मिलिंद कांबळे, वांझ, प्रतिमा प्रकाशन, पुणे

९)	तानाजी धरणे, हेलपाटा

१०)	बाळासाहेब भडकवाड, फिरकी

११) कुसुमावती देशपांडे, मराठी कादंबरी : पहिले शतक, मुंबई मराठी साहित्य संघ, द्वितीय आवृत्ती - १९७५ पृ - १५ -१६

१२) रवींद्र ठाकूर, मराठी ग्रामीण कादंबरी, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे

१३) गंगाधर गाडगीळ, साहित्याचे मानदंड, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई

१४) ना. सी. फडके, कादंबरीची वाटचाल, परिसंवाद, पुणे

१५) नागनाथ कोत्तापल्ले, ग्रामीण साहित्य स्वरूप आणि शोध, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे

संशोधन मार्गदर्शक

प्रा.डॉ. हंसराज दत्तात्रय भोसले
मराठी विभाग
महाराष्ट्र महाविद्यालय निलंगा जि. लातूर

संशोधक

धंनजय उद्धवराव काळे